**प्रतिवादीतर्फे साक्षीदार क्र. १ आनंदा गंगाधर गांगुर्डे यांचा शपथेवर ज्यादाचा सरतपास प्रतिवादीचे विधिज्ञ श्री. डी. आर. गांगुर्डे यांच्यातर्फे शपथेवर सुरु**

१. प्रस्तुतकामी मी जे पुराव्याचे शपथपत्र दाखल केले आहे त्यातील मजकूर माझ्या सांगण्याप्रमाणे लिहिलेला असून तो खरा व बरोबर आहे. मी प्रस्तुतकामी वादींच्या नोटीसला जी उत्तरी नोटीस दिलेली आहे. ती खरी व बरोबर आहे.

**ज्यादाचा सरतपास पूर्ण**

**उलटतपास वादीचे विधिज्ञ श्री. एस. डी. जाधव यांच्यातर्फे शपथेवर सुरु**

२. माझे शिक्षण इयत्ता ७ वी पर्यंत झालेले आहे. प्रतिवादी क्र. २ ने सदर दाव्यात पुरावा देण्यासाठी मला त्याच्यावतीने कोणतेही मुखत्यारपत्र दिलेले नाही. मी व प्रतिवादी क्र. २ विभक्त राहतो. हे म्हणणे खरे आहे की आमच्या दोघांच्या जमिनीचे वाटप झालेले असून त्यानुसार आमच्या नावांची अभिलेखाला नोंद झालेली आहे.

३. हे म्हणणे खरे आहे की तिसगाव येथील गट नं. ४३० क्षेत्र ० हे. ७४ आर, पो. ख. ०.४ आर असे एकूण ० हे. ७८ आर क्षेत्र वादी विश्वनाथ सोनवणे यांच्या मालकीचे आहे. हे म्हणणे खरे आहे की तिसगाव येथील गट नं. ४३१ चे क्षेत्र ०.९१ आर हे क्षेत्र माझ्या मालकीचे आहे. हे म्हणणे खरे आहे की गट नं. ४३१ पैकी ०.१२ आर क्षेत्र प्रतिवादी क्र. २ च्या मालकीच्या आहे. हे म्हणणे खरे आहे की गट नं. ४३० मधील वादीच्या मालकीचे ०.७८ क्षेत्राच्या पूर्व बाजूला माझे व प्रतिवादी क्र. २ चे क्षेत्र आहे.

हे म्हणणे खरे नाही की गट नं. ४३१ च्या ७/१२ उताऱ्याला रंजनाबाई रौंदळ, विलास कारभारी, अलकाबाई भगिरथ, हिराबाई कारभारी यांची केवळ नावे नोंद आहेत व त्यांचे क्षेत्र हे रस्त्याखाली गेले आहे. गट नं. ४३१ मध्ये रंजनाबाई रौंदळ, विलास कारभारी, अलकाबाई भगिरथ, हिराबाई कारभारी यांचा प्रत्यक्ष कब्जा आहे व ते क्षेत्र वहिती करतात हे दाखवण्यासाठी माझ्याकडे कोणताही कागदोपत्री पुरावा नाही. मी गट नं. ४३१ चा ७/१२ उतारा पाहिलेला आहे. गट नं. ४३१ च्या ७/१२ उताऱ्याला पिक पाहणीला जी नोंद झालेली आहे. ती बरोबर आहे. मला आता गट नं. ४३१ चा ७/१२ उतारा दाखवला. त्यावर पिक पाहणीला रंजनाबाई रौंदळ, विलास कारभारी, अलकाबाई भगिरथ, हिराबाई कारभारी यांची नावे नोंद नाहीत. हे म्हणणे खरे आहे की रंजनाबाई रौंदळ, विलास कारभारी, अलकाबाई भगिरथ, हिराबाई कारभारी यांचे क्षेत्र रस्त्याखाली गेल्यामुळे गट नं. ४३१ च्या पिक पाहणीला त्यांचे नाव नाही.

४. हे म्हणणे खरे आहे की वादी व आमच्यामध्ये क्षेत्रावरुन पहिल्यांदा वाद सन २०१३ मध्ये चालू झाला. हे म्हणणे खरे नाही की सन २०१३ मध्ये मी व प्रतिवादी क्र. २ ने बांध फोडून अतिक्रमण केले असे वादी म्हणत होता त्यावरुन आमच्यामध्ये वाद चालू झाला. हे म्हणणे खरे नाही की त्यावेळी आम्ही वादीला म्हणालो की, तु मोजणी करुन घे अतिक्रमण निघत असेल तर आम्ही तुला अतिक्रमित क्षेत्राचा कब्जा देऊ. हे म्हणणे खरे आहे की त्यामुळे वादीने गट नं. ४३० व लगतच्या क्षेत्राच्या मोजणीसाठी अर्ज दिला. हे म्हणणे खरे आहे की वादीने जो मोजणीचा अर्ज दिला त्याचा नंबर

२८२७/२०१४ असा आहे. हे म्हणणे खरे आहे की त्यानुसार मोजणीला हजर राहण्यासाठी मोजणीदाराने आम्हाला सगळ्यांना नोटीसा दिल्या होत्या. हे म्हणणे खरे आहे की त्यानुसार दि.०२.१२.२०१४ रोजी मोजणी झाली. हे म्हणणे खरे आहे की दि.२४.१२.२०१४ रोजी मोजणीदाराने हद्द निशाण्या कायम केल्या. हे म्हणणे खरे आहे की मोजणीदाराने गट नं. ४३० चे ५ आर क्षेत्र माझ्याकडे अतिक्रमित क्षेत्र म्हणून पिवळ्या रंगाने नकाशामध्ये दाखवले. साक्षीदार स्वतःहून सांगतो की मोजणीदाराने ते चुकीचे दाखवले आहे. त्या मोजणीवेळी मी व प्रतिवादी क्र. २ प्रत्यक्ष हजर होतो. तसेच मोजणीदाराने हद्द निशाण्या दाखवल्या तेव्हा देखील मी व प्रतिवादी क्र. २ हजर होतो.हे म्हणणे खरे नाही की त्यामुळे वादीने आमच्याकडे अतिक्रमित क्षेत्राचा कब्जा मागितला. हे म्हणणे खरे नाही की आम्ही अतिक्रमित क्षेत्राचा कब्जा वादीला न दिल्यामुळे वादीने दि.०५.०६.२०१५ रोजी आम्हाला वकीलांमार्फत कायदेशीर नोटीस पाठविली. मला आता निशाणी २७ व २८ कडील पोस्टाची पोहोच पावती दाखवण्यात आली. त्यावरील सही माझी व प्रतिवादी क्र. २ ची नाही. आमचे गावातील पोस्टमनशी काहीही भांडण नाही. हे म्हणणे खरे नाही की वादीने पाठवलेल्या नोटीसला मी वकीलांमार्फत लेखी उत्तरी नोटीस देखील पाठवलेली आहे. मला आता मी वादींना दि. २९.०६.२०१५ रोजी पाठविलेली मूळ उत्तरी नोटीस दाखवण्यात आली. त्यावर माझी व प्रतिवादी क्र. २ ची सही आहे तसेच त्यावर माझ्या वकीलांची सही आहे. त्याला **निशाणी ५२** देण्यात येते. हे म्हणणे खरे नाही की आम्ही वादीला लेखी उत्तरी नोटीस दिली नसल्याचे खोटे नमूद केले

आहे. हे म्हणणे खरे नाही की वादीला आम्ही लेखी उत्तरी नोटीस देऊन देखील मी त्यानुसार लेखी उत्तरी नोटीस वादीला दिली नसल्याचे खोटे नमूद केले आहे. वादीने दिलेली नोटीस मिळाल्यानंतर वादीने केलेली मोजणी मान्य नाही म्हणून मी सन २०१५ मध्ये निमताना मोजणीसाठी अर्ज केला होता. त्यानुसार सन २०१५ मध्ये निमताना मोजणी झाली. निमताना मोजणी मला मान्य नसल्यामुळे मी त्याच्या कागदपत्रांवर सही केली नाही व ते कागदपत्र घेतले नाहीत. त्यामुळे सन २०१५ मध्ये केलेल्या निमताना मोजणीचे कागदपत्र मी न्यायालयात दाखल करु शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की सन २०१५ मध्ये मी निमताना मोजणी करुन घेतलेली नसल्यामुळे त्याचे कागदपत्र मी प्रस्तुतकामी दाखल करु शकत नाही.

५. हे म्हणणे खरे आहे की एखाद्या शेतजमिन मिळकतीमध्ये घर, चाळ, विहीर बांधली असेल तर त्याची नोंद ७/१२ पत्रकी केलेली असते. हे म्हणणे खरे नाही की गट नं. ४३१ च्या ७/१२ उताऱ्याला माझ्या घराची नोंद नाही. गट नं. ४३१ च्या ७/१२ उताऱ्याला माझ्या घराची नोंद कधी केली ते मला सांगता येणार नाही. मला आता निशाणी २५ कडील गट नं. ४३१ चा ७/१२ उतारा दाखवण्यात आला. त्यावर माझ्या घराची नोंद नाही. गट नं. ४३१ च्या ७/१२ उताऱ्याला माझ्या घराची नोंद असलेला उतारा न्यायालयात दाखल करायला मी तयार नाही. हे म्हणणे खरे आहे की परशराम शिवराम ठाकरे, शंकर परशराम ठाकरे यांनी दि.२१.१२.२००० रोजी कारभारी हरी आहेर यांच्याकडून गट नं. ४३१ पैकी रस्त्यालगत पश्चिम बाजूकडील मध्यभागाचे ०.६५ आर क्षेत्र विकत घेतलेले आहे. मला आता

त्या खरेदी पत्राची प्रमाणित प्रत दाखवण्यात आली. त्याला **निशाणी ५३** देण्यात येते. त्या खरेदीपत्रातील लिहिलेल्या चतु:सिमा बरोबर आहेत. हे म्हणणे खरे आहे की परशराम व शंकर ठाकरेचे क्षेत्र आमच्या क्षेत्राच्या दक्षिणेला आहे. परशराम व शंकर ठाकरेचे क्षेत्र वादीच्या क्षेत्राच्या उत्तर बाजूला आहे.

६. हे म्हणणे खरे आहे की वादी व त्याच्या भावांमध्ये वाटप झालेले आहे. हे म्हणणे खरे आहे की त्यानुसार फेरफार क्र. ६५३ नुसार वादी व त्याच्या भावामध्ये झालेल्या वाटपाची नोंद देखील झालेली आहे. फेरफार नोंद क्र. ६५३ मला आता दाखवण्यात आला. तो बरोबर आहे. त्याला **निशाणी ५४** देण्यात येते. हे म्हणणे खरे आहे की प्रस्तुत दाव्याचे कामकाज चालू असतांना मी दि.३०.०४.२०२४ रोजी माझ्या गट नं. ४३१ ची मोजणी करुन घेतली व त्या मोजणीचा नंबर मो.र.नं. ७२२७/२०२४ असा पडलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की मो.र.नं. ७२२७/२०२४ मध्ये मोजणीदाराने मोजणी करुन तसा नकाश देखील तयार केलेला आहे. त्या मोजणीवेळी मी हजर होतो. हे म्हणणे खरे आहे की ती मोजणी दि.१४.०५.२०२४ रोजी केली व दि.११.०६.२०२४ रोजी हद्द निशाण्या दाखवण्यात आल्या. ती मोजणी बरोबर केलेली आहे. मो.र.नं. ७२२७/२०२४ मध्ये केलेल्या मोजणीबाबत माझी कोणतीही तक्रार नाही. मला आता मो.र.नं.७२२७/२०२४ मधील नकाशाची प्रमाणित प्रत दाखवण्यात आली. त्यातील मजकूर खरा व बरोबर असून तो मला मान्य आहे. त्याला **निशाणी ५५** देण्यात येते. हे म्हणणे खरे नाही की त्या

मोजणीवेळी माझे व पंचांचे जाबजबाब देखील घेतले. हे म्हणणे खरे आहे की त्यावेळी मी जाबजबाबावर सह्या देखील केली. मला आता मो.र.नं. ७२२७/२०२४ मधील नकाशासोबत दाखल केलेले जाबजबाब व पंचनामा दाखवण्यात आला. त्यावर माझी, पंचांची व लगत कब्जेदारांची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. दि.१४.०५.२०२४ रोजी नोंदवलेल्या दोन जबाबांना अनुक्रमे **निशाणी ५६ व ५७** देण्यात येते. तसेच दि.१४.०५.२०२४ रोजी केलेल्या पंचनाम्याला **निशाणी ५८** देण्यात येते. दि.११.०६.२०२४ रोजी मोजणीदाराने माझा व लगत कब्जेदार यांचा जबाब घेतला. तो मला आता दाखवण्यात आला. ते जाबजबाब बरोबर असून त्यांना अनुक्रमे **निशाणी ५९ व ६०** देण्यात येतात. तसेच दि.११.०६.२०२४ रोजी पंचनामा करण्यात आला. तो मला आता दाखवण्यात आला. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावर पंचांची व मोजणीदाराची सही आहे. त्याला **निशाणी ६१** देण्यात येते.

**वादींच्या वकीलांच्या तोंडी विनंतीवरुन उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.**

श्रवणोत्तर स्विकृत,

SUNGARE VRUSHALI DINANATH

Digitally signed by SUNGARE VRUSHALI DINANATH
Date: 2025.10.03 13:20:34 +0530

दि. ०३.१०.२०२५.

(वृषाली दी. सुंगारे)

चांदवड

सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
चांदवड.